ePaper

**वसंत मोरे राष्ट्रवादीची तुतारी फुंकणार? पुण्यातून लोकसभा निवडणूक लढणार!**



| वर्ष - 7 | अंक - 297 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | शुक्रवार, दिनांक 15 मार्च 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

**आतील पानांत**


- मुंबईने जिंकली रणजी ट्रॉफी
- नेहाला देण्यात आलेला डच्चू!
- बांग्लादेशात २३ टक्के हिंदू
- नागपूर होणार 'लॉजिस्टिक कॅपिटल!


## शिरूरमध्ये शिवाजीराव आढळराव पाटील, विलास लांडे

# महायुतीच्या उमेदवारीसाठी प्रयत्नशील!

**। पिंपरी । महाईन्यूज ! प्रतिनिधी**

**महायुतीमधील शिरूर लोकसभेच्या जागा वाटपाचा तिढा न सुटल्याने इच्छुकांचा जीव अद्याप टांगणीलाच आहे. शिवसेनेचे माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी आपला दावा कायम ठेवला आहे. तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला या मतदारसंघात असणारी राजकीय स्पेस पाहून माजी आमदार विलास लांडे हे देखील शड्डू ठोकून मैदानात उतरल्याचे दिसते. आढळराव पाटील आणि लांडे यांच्यात सध्या उमेदवारीवरून रस्सीखेच पाहायला मिळत आहे.**



मात्र जागा वाटपाबाबत तसेच उमेदवारीच्या निश्चितीबाबत अद्याप नेत्यांनी भूमिका स्पष्ट केली नाही. त्यामुळे आढळराव पाटील यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तर विलास लांडे यांना उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निर्णयाची प्रतीक्षा असल्याची राजकीय स्थिती आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी मध्ये पडलेल्या फुटीनंतर राज्यातील राजकीय गणिते बदलली आहेत. आमदार, खासदार यांच्या देखील राजकीय कोलांट उड्या पाहायला मिळत आहेत. या पैकी काही जणांना फायदा तर काही जणांची राजकीय अडचण झालेली पाहायला मिळत आहे. शिरूर लोकसभेत हेच चित्र दिसत आहे. शिवसेनेचे माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी उद्धव ठाकरे यांची साथ सोडत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबत जाण्याचा निर्धार केला. मात्र महायुतीच्या भांडणात त्यांची चांगलीच गोची झाल्याचे पाहायला मिळत आहे. या मतदारसंघावर उपमुख्यमंत्री अजित पवारांनी दावा केल्याने त्यांच्या उमेदवारीचा घोळ निर्माण झाला आहे. तिकीट मिळेल की नाही याची देखील निश्चित शाश्वती आढळराव पाटील यांना दिसेना झाली आहे. तर दुसरीकडे पुण्याच्या म्हाडाचे अध्यक्षपद देऊन त्यांना खासदारकीच्या स्पर्धेतून बाहेर ढकलले असल्याचे बोलले जात आहे.

परिणामी मुख्यमंत्री शिंदे यांच्या निर्णयाची आढळराव यांना प्रतीक्षा आहे. त्यांच्याबाबत कोणता निर्णय होतो हे पाहावे लागणार आहे.

दुसरीकडे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पक्षातून लढण्यासाठी सज्ज असल्याचे सांगून माजी आमदार विलास लांडे यांनी देखील डाव टाकायला सुरुवात केली आहे. विविध माध्यमातून त्यांनी आपली दावेदारी उघड केली आहे. पक्षातून आढळराव यांच्या नावाची चर्चा सुरू झाल्यानंतर त्याविरोधात लांडे यांनी राजकीय खेळ्या सुरू केल्या आहेत. आयात उमेदवारीचा मुद्दा उपस्थित करत लांडे यांनी त्यांच्या उमेदवारीला खो घातला आहे. आपल्याकडे लक्ष वेधले जावे म्हणून खासदार शरद पवारांच्या कार्यक्रमांना ते उपस्थिती दर्शवून राजकीय मूल्य निर्माण करत आहेत. त्यांच्या या खेळीला उपमुख्यमंत्री अजित पवार सकारात्मक प्रतिसाद देतात का हा मात्र उत्सुकतेचा प्रश्न आहे.

### राष्ट्रवादीतून नको ; आढळराव यांच्या कार्यकर्त्यांचा आग्रह -

» उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शिरूर लोकसभेवर दावा केल्यानंतर त्यांच्या पक्षातून तिकिट मिळवण्यासाठी माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी प्रयत्न सुरू केले होते. त्यासाठी त्यांनी तातडीने समर्थक कार्यकर्त्यांची आंबेगाव, लांडेवाडी येथील त्यांच्या निवासस्थानी बैठक बोलावली होती. या बैठकीत आपण शिवसेनेच्या चिन्हावर आणि पक्षातूनच लढावे, असा कार्यकर्त्यांनी आग्रह धरला असल्याची चर्चा आहे. त्या बैठकीनंतर आढळराव पाटील यांचा देखील राजकीय सुर बदलल्याचे पाहायला मिळत आहे. आपल्या उमेदवारीचा निर्णय त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर सोपवला. तेव्हापासून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पक्षात जाण्याची त्यांची घाई काही अंशी कमी झाल्याचे चित्र आहे.

# इंद्रायणी नदीत मृत मास्यांचा खच...

## » मृत माशांमध्ये गोल्डन, महाशिर, शिवडा असा प्रजातींचा समावेश

**। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**इंद्रायणी नदीच्या प्रदूषणात वाढ होत असून तीर्थक्षेत्र देहूगाव येथे विविध प्रकारचे मासे मृतावस्थेत आढळले. मृत माशांमध्ये गोल्डन, महाशिर, शिवडा असा प्रजातींचा समावेश असून त्यांची लांबी साधारण साडेतीन फूट आहे.**

देहूगाव येथे इंद्रायणी नदीच्या काठावर बुधवारी नागरिक फिरायला गेले असता त्यांना कापूरवडा येथे मोठ्या संख्येने मासे मृतावस्थेत आढळले. इंद्रायणी नदीत वाम, मरळ, चीलापी असे मासे आजवर आढळत होते. मात्र या नदीत देवमाशांसारखे दुर्मिळ मासे देखील असल्याचे निदर्शनास आले आहे. मृत झालेल्या माशांमध्ये देवमासे देखील मरण पावले आहेत. इंद्रायणी नदी पात्रात ठिकठिकाणी जलपर्णी वाढली आहे. तिथे माशांना पाण्याच्या वरच्या भागात येता येत नाही. त्यामुळे मासे जलपर्णी कमी असलेल्या कापूरवडा परिसरात आले.

### प्राणवायूचे प्रमाण कमी झाल्याने मास्यांचा मृत्यू

» ओढ्यातून शहरातील सांडपाणी कोणतीही प्रक्रिया न करता सोडले जात असल्याने पाणी अत्यंत प्रदूषित झाले आहे. इंद्रायणी नदीच्या पाण्यातील प्राणवायूचे प्रमाण कमी झाल्याने मास्यांचा मृत्यू झाला आहे.



# आमदार लंकेंचा पक्षप्रवेश टळला!

## » लंके यांचा राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश?



। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**राष्ट्रवादी काँग्रेसचे पारनेरचे आमदार नीलेश लंके यांचा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश होणार असल्याची चर्चा सुरू झाली असताना लंके आणि शरद पवार यांची गुरुवारी भेट झाली. मात्र थेट पक्षप्रवेश झाला नाही. पवार यांच्या विचारसरणी मला नेहमीच मान्य आहे, असे लंके यांनी पत्रकार परिषदेत जाहीर केले. त्यामुळे ते मनाने शरद पवार यांच्यासमवेत असल्याचेही स्पष्ट झाले.**

दरम्यान, लंके यांनी पक्ष प्रवेश केल्यास त्यांची आमदारकी धोक्यात येईल, असे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले आहे. त्यामुळे तांत्रिक अडचणींमुळे लंके यांचा पक्ष प्रवेश तूर्त टळला असल्याचे पुढे आले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतर अजित पवार यांच्यासमवेत गेलेले आमदार नीलेश लंके राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश करणार असल्याची जोरदार चर्चा गेल्या काही दिवसांपासून सुरू आहे. यापूर्वी शरद पवार यांनी ही अफवा असल्याचे स्पष्ट केले होते. मात्र शिरूरचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी लंके यांच्या भेटीनंतर ते पक्ष प्रवेश करणार असल्याचे स्पष्ट संकेत दिले होते. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्या उपस्थितीत लंके यांनी लिहिलेल्या 'मी अनुभवलेला कोविड' या पुस्तकाचे प्रकाशन पवार यांच्या हस्ते होणार असून ते जाहीर पक्ष प्रवेश करणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू होती. मात्र या तिघांनी गुरुवारी पक्ष कार्यालयात पत्रकार परिषद घेतली. मात्र प्रवेशाबाबत थेट बोलणे टाळले. त्यामुळे त्यांच्या पक्ष प्रवेशाबाबतचा संभ्रमही कायम राहिला.'तुमच्या हातात घड्याळ आहे की तुतारी ? असा थेट प्रश्न लंके यांना विचारण्यात आला असता 'साहेब सांगतील तो आदेश', असे सूचक उत्तर त्यांनी दिले. मात्र पक्ष प्रवेशाबाबत बोलणे टाळले. मी शरद पवार यांच्या विचारधारेबरोबर आहे. लहानपणापासूनच शरद पवार यांच्या नेतृत्वाचा आणि विचारांचा माझ्यावर पगडा आहे. करोना संकट काळातील अनुभवांवर लिहिलेल्या पुस्तकाचे प्रकाशन पवार यांच्या हस्ते व्हावे, अशी माझी इच्छा होती. त्यासाठी मी पुण्यात आलो आहे,' असे लंके यांनी स्पष्ट केले. विचारधारा आहे मग पक्षही एकच आहे का, असे विचारण्यात आले असता, विचारधारा आणि पक्ष एकच आहे. माझ्या कार्यालयातही पवार यांचे छायाचित्र आहे. मी कधीही शरद पवार यांच्याविरोधात टीकाटिप्पणी केलेली नाही, याकडे त्यांनी लक्ष वेधले.पारनेर तालुक्यातील कष्टाळू कार्यकर्ते म्हणून लंके सर्वांना परिचित आहेत. ते आमच्या पक्ष कार्यालयात आले. त्यासाठी मी त्यांचे स्वागत करतो. यापुढे त्यांना कोणतीही मदत लागली तर त्यांना निश्चित सहकार्य केले जाईल, अशी प्रतिक्रिया शरद पवार यांनी दिली.

### पक्ष प्रवेश तूर्त टळला

» लंके यांच्या पक्ष प्रवेशाबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीही बारामती दौऱ्यात प्रतिक्रिया दिली. लंके यांनी चुकीची भूमिका घेऊ नये. त्यांची चुकीची भूमिका घेतल्यास त्यांची आमदारकी धोक्यात येईल. पक्षाच्या विरोधात भूमिका घेतली तर, पक्षांतर्गत बंदी कायद्यानुसार आमदारकी रद्द होते, अशी सूचक प्रतिक्रिया अजित पवार यांनी दिली. त्यामुळे तांत्रिक अडचणींमुळेच लंके यांचा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षातील प्रवेश तूर्त टळल्याचे दिसत आहे.ष्ट्रवादी काँग्रेसचे पारनेरचे आमदार नीलेश लंके यांचा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश होणार असल्याची चर्चा सुरू झाली असताना लंके आणि शरद पवार यांची गुरुवारी भेट झाली. मात्र थेट पक्षप्रवेश झाला नाही. पवार यांच्या विचारसरणी मला नेहमीच मान्य आहे, असे लंके यांनी पत्रकार परिषदेत जाहीर केले. त्यामुळे ते मनाने शरद पवार यांच्यासमवेत असल्याचेही स्पष्ट झाले. दरम्यान, लंके यांनी पक्ष प्रवेश केल्यास त्यांची आमदारकी धोक्यात येईल, असे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले आहे. त्यामुळे तांत्रिक अडचणींमुळे लंके यांचा पक्ष प्रवेश तूर्त टळला असल्याचे पुढे आले आहे.

# निलेश लंकेला मीच पक्षात आणलं : अजित पवार

## » आम्ही सुरुवातीपासूनच पवारांच्या विचारांचे आहोत : लंके



।पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**अजित पवार गटाचे आमदार निलेश लंके यांनी आज (दि.14) राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार या पक्षात प्रवेश केला. आम्ही सुरुवातीपासूनच पवारांच्या विचारांचे आहोत, असं निलेश लंके यांनी स्पष्ट केलं. दरम्यान, आता अजित पवारांनी निलेश लंकेंच्या प्रवेशाबाबत प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.**

"वास्तविक निलेशला पक्षात मी घेतल. निलेशला मनापासून आधार दिला. विकास कामांसाठी मी त्याला प्रचंड निधी दिला होता", असं अजित पवार म्हणाले. ते बारामती येथे बोलत होते. अजित पवार म्हणाले, निलेश लंके जाऊ शकत नाही. त्याला जायचं असेल तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा राजीनामा द्यावा लागेल. त्याच्यामुळे राजीनामा देऊन कोणालाही कोठेही जाता येतं. वास्तविक निलेशला पक्षात मी घेतल. निलेशला मनापासून आधार दिला. विकास कामांसाठी मी त्याला प्रचंड निधी दिला होता. कालच माझ्याकडे तो आला होता. काही गोष्टी त्याला मी नीट समजून सांगितल्या. मात्र, काही लोकांनी त्याच्या डोक्यात हवा घातलेली आहे की, तू खासदार होशील. मात्र, अस काहीही नाही. निपुढे बोलताना लंके म्हणाले, मी शरद पवारांची भेट घ्यायला आलो ते खासदारकीची आशा आहे म्हणून  नाही. मी काल देखील साहेबांच्या विचारांचा होतो आणि आजही त्यांच्याच विचारांचा आहे. इथे येण्यापूर्वी मी लोकसभेसाठी कोणतीही चर्चा केलेले नव्हती. मी शरद पवार साहेबांच्या आशीर्वादाने अद्ययावत सुविधा असलेली रुग्णवाहिका सुरु करणार आहे. आज माझ्यासोबत अहमदनगर आणि पारनेरमधील अनेक सहकारी उपस्थित आहेत, त्यांचेही मी आभार मानतो, असंही लंके यावेळी म्हणाले होते. लेश लंके (Nilesh Lanke) म्हणाले, कोरोना काळात पती त्याच्या पत्नीला विसरला. भाऊ भावाला विचारत नव्हता. त्या काळात मी पवार साहेबांच्या नावाने आरोग्य मंदिर सुरु केले. आरोग्य मंदिराच्या माध्यमातून 31 हजार लोकांवर उपचार करता आले. पवार साहेबांची अदृश्य ताकद माझ्यासोबत होती. या घटना मी आयुष्यात कधीही विसरु शकणार नाही. मी साहेबांना कधीही सोडून गेलेलो नव्हतोच, असंही लंके यांनी स्पष्ट केलं.

### मी त्याला प्रचंड निधी दिला

» "वास्तविक निलेशला पक्षात मी घेतल. निलेशला मनापासून आधार दिला. विकास कामांसाठी मी त्याला प्रचंड निधी दिला होता", असं अजित पवार म्हणाले. ते बारामती येथे बोलत होते. अजित पवार म्हणाले, निलेश लंके जाऊ शकत नाही. त्याला जायचं असेल तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा राजीनामा द्यावा लागेल. त्याच्यामुळे राजीनामा देऊन कोणालाही कोठेही जाता येतं. वास्तविक निलेशला पक्षात मी घेतल. निलेशला मनापासून आधार दिला. विकास कामांसाठी मी त्याला प्रचंड निधी दिला होता.

# मावळ लोकसभेवर

# इंडिया आघाडीचा झेंडा फडकणार!

## सचिन अहिर: इंडिया आघाडीच्या बैठकीत वाघेरेंना विजयी करण्याचा निश्चय

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**लोकशाही संपविण्याचा प्रयत्न हुकूमशाही माध्यमातून सुरू आहे. देशाच्या हितासाठी, तसेच गद्दारी करणा-यांना धडा शिकविण्यासाठी सर्व मिळून आपली ताकद पणाला लावू आणि आगामी निवडणुकीत मावळ लोकसभेवर इंडिया आघाडीचा झेंडा फडकवू, असे आवाहन शिवसेना सचिन अहिर यांनी केले. त्यांच्यासह रायगड जिल्ह्यातील आघाडीतील सर्वच पदाधिकारी, कार्यकर्त्यांचा संजोग वाघेरेंना विजयी करण्याचा निश्चय यावेळी केला.**




कर्जतच्या चौक नाका येथे मावळ लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडी व इंडिया आघाडीतील सर्व राजकीय पक्ष आणि संघटना यांचे शहराध्यक्ष, प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांची समन्वय बैठक बुधवारी (दि.14) कर्जत येथील चौक नाका येथे पार पडली. या बैठकीत मार्गदर्शन करताना सचिन अहिर बोलत होते. या प्रसंगी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे मावळ लोकसभा संघटक संजोग वाघेरे पाटील, शेतकरी कामगार पक्षाचे माजी आमदार बाळासाहेब पाटील, शिवसेना उरणचे माजी आमदार मनोहर भोईर, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे रायगड जिल्ह्याचे प्रभारी प्रशांत पाटील, शिवसेना नेते समन्वयक बबन पाटील, शेतकरी कामगार पक्षाचे प्रितम म्हात्रे, पनवेल शिवसेना जिल्हाप्रमुख शिरीष घरत, श्रीनाथ पाटील, आम आदमी पार्टीचे पनवेल विधानसभा अध्यक्ष शेखर जांभळे, पनवेल समाजवादी पार्टीचे अध्यक्ष नाईक साहेब, काँग्रेसचे पनवेल विधानसभा अध्यक्ष सुदाम पाटील, मावळ लोकसभा समन्वयक (शरदचंद्र पवार गट) सुवर्णा जोशी, भावणाताई घाणेकर, खालापूरचे माजी नगराध्यक्ष संतोष जंगम यांच्यासह सर्व तालुकाध्यक्ष, जिल्हा परिषद सदस्य, सरपंच आदी उपस्थित होते.

देश हुकूमशाहीकडे वाटचाल करत असून भाजप सरकार संविधान संपवण्याचे काम करत असल्याचे सांगत सचिन अहिर यांनी आघाडीच्या उमेदवारांना विजयी करण्याचे केले. ते पुढे म्हणाले की, शिवसेना सोडून गद्दारांना मावळ मतदारसंघात गाडून टाकणाऱ्यांना धडा शिकवण्याची हीच वेळ आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा आणि इंडिया आघाडीचा झेंडा फडकवण्यासाठी सज्ज व्हा. शिवसेना आणि बाळासाहेब ठाकरे यांचे जे होऊ शकले नाही. ते तुमचे आणि आमचे काय होणार, असा थेट सवाल गद्दारी करणा-यांना त्यांनी केला. तसेच इंडिया आघाडीचे उमेदवार संजोग वाघरे यांना भरघोस मतांनी निवडून देण्याचे काम आपल्याला करायचे आहे, असेही ते म्हणाले.

### मावळ लोकसभेच्या विकासासाठी कटिबद्ध – संजोग वाघेरे

**पुणे आणि रायगड अशा दोन भागात विस्तारलेला हा मावळ लोकसभा मतदारसंघ अनेक अर्थाने महत्वाचा आहे. या मतदारसंघात वेगवेगळे प्रश्न आणि वेगवेगळ्या समस्या आहेत. सोबतच्या आपल्या सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना घेऊन या समस्या सोडवण्यासाठी, तसेच मावळ लोकसभा मतदारसंघाचा विकास घडवून आणण्यासाठी मी कटिबद्ध आहे, असे यावेळी संजोग वाघेरे पाटील यांनी म्हटले. आपल्या सर्वांना मिळून ही लढाई लढायची असून भविष्यातही चांगली वाटचाल करायची असल्याचे ते यावेळी उपस्थित इंडिया आघाडीतील पदाधिकारी, कार्यकर्त्यांशी बोलताना म्हणाले.**

---

# निवडणुकीच्या तोंडावर घोषणा म्हणणाऱ्यांना चपराक..!

## प्राधिकरण परतावा : भाजपा आमदार महेश लांडगे यांनी 'जीआर' दाखवला

। पिंपरी।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवडमधील भूमिपूत्रांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न प्राधिकरण बाधितांचा साडेबारा टक्के परतावा प्रश्न ५० वर्षांच्या प्रतिक्षेनंतर मार्गी लागला. मात्र, आगामी निवडणुकीच्या तोंडावर ही केवळ घोषणाबाजी आहे. प्रत्यक्षात 'जीआर' नाही, असा दावा केला जात होता. मात्र, कॅबिनेट बैठकीत निर्णय झाल्यानंतर अवघ्या दोन दिवसांत भाजपा आमदार महेश लांडगे यांनी 'जीआर' काढून दाखवला. त्यामुळे भूमिपुत्रांमध्ये आनंदोत्सव साजरा केला जात आहे.**



राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार, विकास प्राधिकरणामार्फत जमीन मालकाना परत करावयाची ६.२५ टक्के विकसित जमीन शक्य असल्यास ज्या गावातील जमीन संपादित केली असेल तेथे देण्यात येईल. त्या गावात तेवढी जमीन उपलब्ध नसेल तर दुसऱ्या गावात उपलब्धतेनुसार वितरित करण्यात येणार आहे. याबाबतच्या प्रस्तावाला कॅबिनेट मंत्रीमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली.

दरम्यान, पिंपरी-चिंचवडसह राज्य पातळीवर प्राधिकरण परतावा निर्णयाचे श्रेय घेण्यासाठी सर्वपक्षीय नेत्यांमध्ये चढाओढ सुरू झाली होती. तसेच, विरोधी पक्षातील स्थानिक राजकीय व्यक्तींनी ही केवळ निवडणुकीच्या तोंडावर केलेली घोषणा आहे, असा दावा जाहीरपणे केला होता. सन १९७२ ते १९८३ या कालावधित संपादित क्षेत्राच्या जमिनीचा मोबदला ज्या शेतकऱ्यांनी यापूर्वीच घेतला आहे, त्यांना या निर्णयानुसार ६.२५ टक्के प्रमाणे जमीन परतावा करण्यापूर्वी त्यांनी तेवढ्या प्रमाणात जमीन मोबदला रक्कम सव्याज (व्याजाची रक्कम जिल्हाधिकारी कार्यालय ठरवेल त्याप्रमाणे, ज्या तारखेपासून मोबदला घेतला असेल त्या तारखेपासून अशा ६.२५ टक्के जमिनीचा ताबा घेण्याच्या तारखेच्या मुदतीपर्यंत) प्राधिकरणाला परत करावी लागणार आहे.

### पिंपरी-चिंचवडकर भूमिपुत्रांना 'जीआर' समर्पित – आमदार लांडगे

**पिंपरी-चिंचवडमधील प्राधिकरण बाधित भूमिपुत्रांनी गेल्या ५० वर्षांपासून केलेल्या प्रतीक्षेचे आज फलित झाले. राज्यातील महायुती सरकारने पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण बाधित शेतकऱ्यांना साडेबारा टक्के म्हणजे ६.२५ टक्के जमीन परतावा आणि २ टक्के चटईक्षेत्र निर्देशांक (एफएसआय) विनामूल्य मंजूर करण्याची मोठी घोषणा कॅबिनेट मंत्रीमंडळाच्या बैठकीत केली होती. त्यानंतर ही निवडणुकीच्या तोंडावर घोषणा असल्याचा दावा केला जात होता. मात्र, अवघ्या दोन दिवसांत अध्यादेश (जीआर) काढण्यात आला. त्यामुळे माझे भूमिपूत्र शेतकरी आणि त्यांच्या कुटुंबियांनी वर्षानुवर्षे लावलेली आस पूर्ण झाली. पिंपरी-चिंचवडकर भूमिपुत्रांना हा 'जीआर' आम्ही समर्पित करतो, अशा भावना आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केल्या आहेत.**



भूमिका

# मंदिर-विकासाचा वसा; पण पालिकांचा खिसा?

**वाढत्या तुटीमुळे राज्यातील विकास कामांवरील तरतुदींमध्ये कपात करावी लागत असताना महायुती सरकारने देवदेवता, मदिरांवर भरभरून खर्च करण्याचे धोरण स्वीकारलेले दिसते.झालेल्या चार महिन्यांच्या लेखानुदानात देवस्थाने आणि स्मारकांसाठी भरीव तरतूद केली, त्याहीनंतर प्रभादेवीच्या सिद्धिविनायक मंदिराचा उज्जैनच्या महाकाल मंदिराच्या धर्तीवर विकास करण्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली.**

त्यासाठी मुंबई महानगरपालिका ५०० कोटींची तरतूद करणार असल्याचे जाहीर केले. मुंबई महानगरपालिकेचा अलीकडेच अर्थसंकल्प सादर झाला आणि त्यात सिद्धिविनायक मंदिराच्या विकास खर्चाकरिता तरतूद करण्यात आलेली नाही. नवीन आर्थिक वर्षांत मंदिर विकासाकरिता निधी खर्च करावा लागणार असल्याने अन्य योजनांवर परिणाम होऊ शकतो किंवा ठेवी मोडाव्या लागतील. रस्ते, पाणीपुरवठा, साफसफाई, आरोग्य, पायाभूत सुविधा, मल:निस्सरण अशा नागरी सुविधा पुरविण्याचे महानगरपालिकेचे कर्तव्य असते. लोकांना चांगल्या सुविधा मिळाल्या पाहिजेत याची खबरदारी महानगरपालिकेने घेणे अपेक्षित असते. महाकाय अशा मुंबईत पालिकेकडून बऱ्यापैकी सुविधा पुरविल्या जातात. अन्य महानगरपालिकांच्या तुलनेत मुंबई महानगरपालिकेचे काम खरोखरीच



वाखाणण्यासारखे आहे. १०० किमीवरील भातसातून पाणी आणून ते शुद्धीकरण करून मुंबईकरांना पुरविण्याचे मोठे आव्हान पालिका पार पाडते. तरीही मुंबईचे प्रश्न गंभीर आहेत. रस्ते, त्यावरील फेरीवाले आणि अतिक्रमणे, त्यातून होणारी वाहतूक कोंडी हा गंभीर प्रश्न सतावत असतो. रस्त्यांवरील खड्डे हा प्रश्न कधीच सुटलेला नाही आणि तो सुटू नये अशीच राजकारणी-अधिकारी-ठेकेदार यांच्या अभद्र युतीची इच्छा असते. पावसाळयात साचणाऱ्या पाण्याचा निचरा करणारा 'ब्रिमस्टोवॅड' प्रकल्प वर्षांनुवर्षे रखडलेला आहे. मुंबईचा चेहरा-मेहरा बदलण्याचा निर्धार सरकारकडून केला जात असताना पायाभूत सुविधा अधिक सक्षम होणे आवश्यक आहे. पण सिद्धिविनायक मंदिर विकास परिसराकरिता मुंबई महानगरपालिका ५०० कोटी खर्च करेल, असे मुख्यमंत्र्यांनीच जाहीर केल्याने प्रशासनाचाही नाइलाज होईल.सिद्धिविनायक मंदिर परिसराचा विकास झालाच पाहिजे व त्यासाठी कोणाचा विरोध असण्याचे कारण नाही. पण हा खर्च मुंबई महानगरपालिकेने का करावा, हा खरा प्रश्न. सिद्धिविनायक मंदिर न्यास आहे. मंदिराची एकूण मालमत्ता १२५ कोटींची असून, प्रतिदिन सरासरी ३० लाखांचे उत्पन्न आहे. मंदिर प्रशासनाकडे पुरेसा निधी नसल्यास अधिकचा निधी सरकारला देता आला असता. मंदिर परिसरात पायाभूत सुविधा पुरविण्याचे काम महानगरपालिकेकडे सोपविले असते तर आक्षेप घेण्याचे काहीच कारण नव्हते. पण विकास आराखडा तयार करण्यापासून सर्व कामे राबविण्याची जबाबदारी महानगरपालिकेवर सोपविण्यात आली आहे. उज्जैनच्या महाकाल मंदिराच्या धर्तीवर सिद्धिविनायक मंदिराचा विकास करण्याची मुख्यमंत्र्यांची योजना आहे. सिद्धिविनायक मंदिर परिसरात तेवढी जागा उपलब्ध नाही. मुख्यमंत्र्यांचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असल्याने मंदिराच्या मागील बाजूला असलेले मोकळया मैदानाची जागा ताब्यात घेतली जाण्याची शक्यता अधिक. सिद्धिविनायक मंदिरापाठोपाठ मुंबादेवी, महालक्ष्मी मंदिरांच्या विकासाची मागणी लगेचच पुढे येऊ शकते. सर्वांना खूश करण्याचे मुख्यमंत्र्यांचे धोरण असल्याने जशी मागणी येईल तशा मंजुऱ्या दिल्या जाऊ शकतात. यातून पालिकांच्या आणि अंतिमत: सर्वसामान्यांच्या खिशावरील आर्थिक भार वाढत जाईल. धार्मिक पर्यटन वाढवण्याचा वसाच महायुती सरकारने घेतलेला दिसतो. लोकांच्या भावनांना हात घालून मते मिळविण्याचा प्रयत्न लपून राहिलेला नाही. नागपूर ते गोवा असा शक्तिपीठ महामार्ग उभारण्याची राज्य शासनाची योजना आहे. सुमारे ८०० किमी मार्गासाठी ८० हजार कोटींचा खर्च अपेक्षित आहे. नवीन रस्त्यामुळे दळणवळणाला फायदाच होतो. पण नवीन रस्ता उभारण्यापूर्वी आर्थिकदृष्ट्या व्यावहारिक ठरतो का, याचाही विचार झाला पाहिजे. मुंबईत शिवडी-न्हावाशेवा हा महत्त्वाचा सागरी पूल वाहतुकीला खुला झाला असला तरी टोलचे अवाच्या सवा दर लक्षात घेता वाहन चालकांकडून त्याचा वापर कमी होतो. अर्थसंकल्पात देवस्थानांसाठी तरतूद, मंदिराच्या विकासासाठी निधी यातून राज्यकर्ते निधर्मवादाच्या संकल्पनेला छेद तर देत नाहीत ना?

## संपादकीय »

### 'खट्टरों'का खिलाडी!

***राज्यातील नेता कोणीही असो, जो काही पाठिंबा मिळणार आहे तो आपल्यामुळे; याची पुरेपूर खात्री भाजपच्या शीर्षस्थ नेत्यांस आहे..***

जाट आंदोलनाचा "प्रश्न या सुमारास पुढे येणार याची कल्पना जाट संघटनांनी एक वर्षांपूर्वी दिली होती.. राज्य हे असे अस्थिरतेच्या लाटांवर हेलकावे खात असताना हे खट्टर बाबा राज्यात गोमांस खाऊ दिले जावे की नये या चर्चेत वेळ घालवत होते. असे दुय्यम सहकारी ही मोदी यांची खरी डोकेदुखी आहे. अशा दुय्यमांना अधिकार देणे हे किती 'खट्टर'नाक याची जाणीव आता तरी मोदी यांना व्हावी" असे 'लोकसत्ता'ने २२ फेब्रुवारी २०२२ रोजी प्रकाशित 'खट्टरनाक' या संपादकीयात लिहिले. साधारण आठ वर्षांनंतर का असेना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना या सत्याची जाणीव झाली असणार. त्यामुळेच खट्टर हे किती कार्यक्षम आहेत, मजबूत आहेत, त्यांच्या नेतृत्वाखाली हरियाणाने कसा विकास साधला आहे, त्यांचे माझे संबंध किती सौहार्दाचे आहेत इत्यादी कौतुक मोदी यांनी केले त्यास २४ तास उलटायच्या आत भाजपने या हरियाणाच्या मुख्यमंत्र्यास नारळ दिला.

गँगस्टर संतोष ऊर्फ काला जठेडीने मंडोली कारागृहाच्या बाहेर पाऊल टाकताच उभ्या असलेल्या गँगस्टर अनुराधा चौधरी ऊर्फ मॅडम मिंजने त्याला घट्ट मिठी मारली तसे त्याच्याभोवती गराडा घातलेले पोलीस मागे सरकले. नेमक्या त्याच संधीचा फायदा घेत अनुराधाने ओढणीआड लपवलेले रशियन बनावटीचे पिस्तूल हळूच कालाच्या खिशात टाकले.

## पोलिसांच्या घरी आधीच बक्षीस पोहोचले

नंतर सुरक्षेच्या गराड्यात त्यांचे वाहन द्वारकेच्या दिशेने धावू लागले तशी नियोजित वधू उद्गारली. 'सारी तय्यारी हो चुकी है' हे वाक्य ऐकताच पोलिसांचे कान टवकारले. हे लक्षात येताच संतोष आश्वस्त सुरात म्हणाला 'काळजी करू नका. आमच्या सुरक्षेची काळजी आम्हीच घेऊ. काहीही होणार नाही. न्यायालयाने विवाहाला परवानगी देताना सांगितल्याप्रमाणे मानवतावादी दृष्टिकोनातून सारे पार पडेल. तुम्ही फक्त तुमच्या बक्षिसापुरते बघा' हे ऐकताच पोलीस बंदुका बाजूला ठेवत निर्धास्त होत खिडकीतून बाहेर बघू लागले. तीच संधी साधून वरवधूची कुजबूज सुरू झाली.लग्नासाठी मिळालेल्या सहा तासांत प्रतिस्पर्धी टोळ्या आपल्याला टपकवण्याच्या तयारीत आहेत. त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी मंडपात सुरक्षेचे एकूण चार स्तर ठेवण्यात आले आहेत. विरोधक वेश बदलून येतील ही भीती लक्षात घेऊन साऱ्या सहकाऱ्यांना त्यांची मूळ व कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहाय्याने तयार केलेली वेशांतरीत छायाचित्रे



पाठवण्यात आली आहेत. लग्न लागल्यावर कुणीही 'जॉय फायरिंग' करायची नाही अशी ताकीद दिली आहे. कायदेशीररित्या हजेरी लावू शकणाऱ्या दोन्ही टोळ्यांतील प्रत्येकाला जामिनाचा आदेश खिशात असू द्या, असे सांगितले आहे.लग्नाला हरियाणा व राजस्थानमधील दोन मोठ्या 'लॉ फर्म'चे दहा वकील हजर असतील. त्यांची लाखोंची फी आधीच अदा करण्यात आली आहे. पोलिसांनी मंजूर केलेल्या वऱ्हाड्यांच्या यादीत आपली १०० माणसे वेगवेगळ्या नावाने घुसवलीत. त्यातले ५० आपल्या कुटुंबाच्या मागेपुढे असतील. आपल्याला नियमित खंडणी देणाऱ्या व या लग्नासाठी मदत करणाऱ्या २५ मान्यवरांना 'आना ही पडेगा, नही तो...' म्हणून निमंत्रित केले आहे. स्कॅनिंग मशीन व सीसीटीव्ही कॅमेरे हाताळणाऱ्या पोलिसांच्या घरी आधीच बक्षीस पोहोचले आहे. लग्नानंतर नृत्यांगना सपनाचा डान्स ठेवला असून त्यात आपल्या सहकाऱ्यांनी नाचून गोंधळ करू नये म्हणून 'सत्या'मधले 'सपने मे मिलता है' हे गाणे अजिबात वाजवायचे नाही अशी सक्त सूचना दिली आहे. लग्न लावणारा पंडित पोलिसांनी निवडला असला तरी काही 'गेम' होऊ नये म्हणून त्याच्यावर २४ तास पाळत ठेवण्यात आली आहे. एवढे करूनही काही दगाफटका झालाच तर बिनधास्त शस्त्रे चालवा असेही साऱ्यांना सांगून ठेवले. तेवढ्यात विवाहस्थळ आले तसे दोघांचे बोलणे थांबले. ते खाली उतरले तेव्हा हजर असलेल्या साऱ्यांनी टाळ्यांच्या गजरात त्यांचे स्वागत केले. आपले सारे सहकारी सूटाबुटात व स्वच्छ दाढी केलेले बघून त्यांना खूप नवल वाटले. सप्तपदीसाठी दोघे विवाहवेदीवर येताच पंडितजीने विधी सुरू केले तसा मंडपात एकाचवेळी पिस्तुलांचे चाप ओढल्याचा आवाज झाला.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# नागपूर होणार 'लॉजिस्टिक कॅपिटल'!

## मल्टिमोडल लॉजिस्टिक पार्कचे गडकरी यांच्या हस्ते उद्घाटन

। मुंबई । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**रेल्वे हा भौगोलिकदृष्ट्या वर्धा जिल्ह्याचा भाग असला तरी नागपूरपेक्षा वेगळे मानत नाही. त्यामुळे नागपूरमधील उद्योगांना सिंदी ड्राय पोर्टशी जोडून मोठ्या प्रमाणात औद्योगिक विकास घडवून आणण्यासाठी प्रयत्न करणार आहे.**



येत्या काळात नागपूर हे देशाचे 'लॉजिस्टिक कॅपिटल' म्हणून नावारुपाला आलेले असेल, अशी ग्वाही केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज गुरुवारी दिली. वर्धा जिल्ह्यातील सिंदी रेल्वे येथे बहुप्रतीक्षित अशा मल्टिमोडल लॉजिस्टिक पार्कचे नितीन गडकरी यांच्या हस्ते उद्घाटन झाले. यावेळी सिंदी रेल्वे टर्मिनल सेवेच्या चाचणीलाही त्यांनी हिरवी झेंडी दाखवली. महत्त्वाचे म्हणजे केंद्रीय मंत्री गडकरी यांच्या संकल्पनेतील महत्त्वाकांक्षी असा हा प्रकल्प आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाच्या अधिपत्याखालील भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि नॅशनल हायवेज लॉजिस्टिक्स मॅनेजमेंट लिमिटेड (एनएचएलएमएल) यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी खासदार रामदास तडस, आमदार पंकज भोयर, आमदार समीर कुणावार, आमदार दादाराव केचे, माजी खासदार सुरेश वाघमारे, जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्टचे (जेएनपीटी) अध्यक्ष उन्मेष वाघ, एनएचएलएमएलचे संचालक के. सत्यनाथन आदींची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. गडकरी यांनी सिंदी येथील ड्रायपोर्टचा शेतकऱ्यांना लाभ होणार असल्याचे सांगितले. ते पुढे म्हणाले की, 'आज विदर्भाच्या शेतातील उत्पादन किंवा याठिकाणी तयार होणाऱ्या वस्तुंची बांगलादेशमध्ये निर्यात करायची असेल, तर रेल्वेने मुंबईला पाठवून तेथून समुद्रामार्गे श्रीलंका व श्रीलंकेतून बांगलादेशला पाठवावे लागते. आता या लॉजिस्टिक पार्कमधून रेल्वेमार्गे थेट हल्दिया (प.बंगाल) आणि तेथून बांगलादेशला आपला माल निर्यात करता येणार आहे. नागपूरचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि नागपूर-मुंबई समृद्धी महामार्ग देखील येथून जवळ आहे. ड्राय पोर्टमुळे लॉजिस्टिक कॉस्ट कमी होईल. परिणामी शेतकऱ्यांच्या मालाला चांगला भाव मिळेल आणि त्यांच्यावर आत्महत्या करण्याची वेळ येणार नाही.' निर्यात करणाऱ्या उद्योगांचे क्लस्टर याठिकाणी तयार होणार असल्याचेही गडकरी म्हणाले. दरम्यान, ड्रायपोर्टसाठी एक सल्लागार मंडळ, यामध्ये प्रकल्पातील तज्ज्ञ, उद्योग क्षेत्रातील व्यक्ती व लोकप्रतिनिधींचा समावेश करण्यासही त्यांनी सांगितले. खासदार रामदास तडस म्हणाले की, '२०१४ पूर्वी वर्धेमध्ये केवळ १६० किलोमीटर लांबीचे रस्ते होते. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी अवघ्या दहा वर्षांत संपूर्ण चित्र पालटले आणि आता ५६० किलोमीटरने रस्त्यांची लांबी वाढली आहे.' सूत्रसंचालन रेणुका देशकर यांनी केले. लॉजिस्टिक पार्कमध्ये विदर्भातील उद्योजकांनी जास्तीत जास्त गुंतवणूक करावी, अशी अपेक्षा गडकरी यांनी व्यक्त केली. 'बाहेरचे उद्योग याठिकाणी येणारच आहेत. पण विदर्भातील मोठ्या उद्योजकांनीही गुंतवणूक करावी. विशेषतः वर्धा जिल्ह्यातील उद्योजकांनी पुढे येण्याची गरज आहे. याठिकाणी शेतीवर आधारित उद्योगांचाही विस्तार करता येईल. जेणेकरून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होईल. त्यात स्थानिकांना रोजगार देण्यास प्राधान्य असेल,' असेही गडकरी म्हणाले. नागपूर ते वर्धा या रेल्वे मार्गावर चौथ्या लाईनचे काम तसेच नागपूर ते वर्धा ब्रॉडगेज मेट्रोचा करार झाल्यामुळे नागपूर-वर्धा अंतर केवळ ३५ मिनिटांत कापणे शक्य होईल, असे नितीन गडकरी यांनी सांगितले.

### पाच वर्षांचा वनवास आता संपला

» येत्या काळात नागपूर हे देशाचे 'लॉजिस्टिक कॅपिटल' म्हणून नावारुपाला आलेले असेल, अशी ग्वाही केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज गुरुवारी दिली. वर्धा जिल्ह्यातील सिंदी रेल्वे येथे बहुप्रतीक्षित अशा मल्टिमोडल लॉजिस्टिक पार्कचे नितीन गडकरी यांच्या हस्ते उद्घाटन झाले. यावेळी सिंदी रेल्वे टर्मिनल सेवेच्या चाचणीलाही त्यांनी हिरवी झेंडी दाखवली. महत्त्वाचे म्हणजे केंद्रीय मंत्री गडकरी यांच्या संकल्पनेतील महत्त्वाकांक्षी असा हा प्रकल्प आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाच्या अधिपत्याखालील भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि नॅशनल हायवेज लॉजिस्टिक्स मॅनेजमेंट लिमिटेड (एनएचएलएमएल) यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. नागपूर ते वर्धा या रेल्वे मार्गावर चौथ्या लाईनचे काम तसेच नागपूर ते वर्धा ब्रॉडगेज मेट्रोचा करार झाल्यामुळे नागपूर-वर्धा अंतर केवळ ३५ मिनिटांत कापणे शक्य होईल, असे नितीन गडकरी यांनी सांगितले. यावेळी सिंदी ते सेलडोह या रस्त्याच्या सिमेंट कॉंक्रीटीकरण आणि चौपदरीकरणासाठी १०६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून लवकरच या रस्त्याचे काम सुरू होईल, असेही गडकरी म्हणाले.

# प्रत्येक गावातून लोकसभेसाठी किमान दोन उमेदवार

## मराठा समाजाला 50 टक्क्यांच्या आत टिकणारे आरक्षण द्यावे

। मुंबई । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**मराठा समाजाला ५० टक्क्यांच्या आत टिकणारे आरक्षण द्यावे आणि मनोज जरांगे पाटील यांच्याविरोधात लावण्यात आलेली एसआयटी रद्द करावी, या मागणीसाठी मराठा समाजाने आता आगामी लोकसभा निवडणुकीत राज्यकर्त्यांची कोंडी करण्याची तयारी सुरू केली आहे.**

औरंगाबाद लोकसभा मतदारसंघात प्रत्येक गावांतून किमान दोन उमेदवार देण्याचा ठराव तालुकास्तरीय बैठकांमध्ये घेतला जात आहे.

शासनाने ओबीसींच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला १० टक्के एसईबीसी आरक्षण दिले. जरांगे यांनी हे आरक्षण अमान्य करीत सगेसोयऱ्यांचा कायदा करावा आणि ओबीसीतूनच आरक्षण द्यावे, ही मागणी लावून धरली आहे. यानंतर राज्य सरकारने जरांगे यांच्याविरोधात एसआयटीची स्थापना केली. यादरम्यान मराठा आरक्षणाविरोधात पुन्हा ॲड. गुणरत्न सदावर्ते यांनी उच्च




न्यायालयात याचिका दाखल केली. शिवाय न्यायालयानेही या याचिकेच्या निर्णयाच्या अधीन राहून एसईबीसी आरक्षणाची पदभरतीचा लाभ आणि इतर सवलती असतील, असे स्पष्ट केले. यामुळे मराठा समाजाने आता राज्यकर्त्यांना थेट लोकसभा निवडणुकीत धडा शिकविण्याचा निर्णय मराठा समाजाने घेतला. औरंगाबाद लोकसभा मतदारसंघातील छत्रपती संभाजीनगर, वैजापूर, कन्नड, खुलताबाद, गंगापूर या तालुक्यांतील मराठा समाजाच्या बैठकांचे आयोजन करण्यात येत आहे. मागील आठवड्यात गंगापूर येथे ५ मार्च रोजी झालेल्या बैठकीत प्रत्येक तालुक्यातून किमान दोन जणांनी उमेदवारी दाखल करावी, असा ठराव घेण्यात आला.

गंगापूर तालुक्यात २२४ गावे आहेत. दोन दिवसांपूर्वी वैजापूर येथे झालेल्या बैठकीत तालुक्यातून १६५ गावांतून तब्बल ६६० मराठा बांधव उमेदवारी दाखल करणार आहेत. कन्नड तालुक्यातील मराठा समाजाची बैठक नुकतीच झाली. या बैठकीत १३८ गावांतून प्रत्येकी दोन उमेदवार मराठा समाज देणार आहेत. छत्रपती संभाजीनगर शहरातील मराठा समाजातील सक्रिय पदाधिकाऱ्यांनी उमेदवारी दाखल करण्याचा निर्णय घेतला.

### 100 जण उमेदवारी दाखल करतील

» लहान गावातून एक, दोन तर मोठ्या गावांतून चार ते पाच जणांनी उमेदवारी दाखल करण्याचा ठराव सकल मराठा समाजाच्या बैठकांमध्ये घेतला जात आहे. निवडणूक अर्ज भरण्यासाठी कोणती कागदपत्रे लागतात, याविषयीची माहिती व्हॉट्सअपद्वारे पुरविली जात आहे. शिवाय मराठा उमेदवारांची यादीही सकल मराठा समाज गोळा करीत आहे.

# शरद पवारांचा फोटो का वापरताय?

## सर्वोच्च न्यायालयाचा अजित पवार गटाला सवाल

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**शिवसेनेप्रमाणेच राष्ट्रवादी काँग्रेसमधील दोन गटांमध्येही पक्षनाव व पक्षचिन्हावरून कायदेशीर लढाई चालू आहे. यासंदर्भात शरद पवार गटानं दाखल केलेल्या याचिकेवर आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. या सुनावणीमध्ये न्यायालयाने अजित पवार गटाला थेट सवाल करत शरद पवारांचे फोटो प्रचाराच्या बॅनर्सवर लावण्याबाबत विचारणा केली. याबाबत शरद पवार गटाने घेतलेला आक्षेप मान्य करत तसे आदेश न्यायालयाने अजित पवार गटाला दिले आहेत. 'लाईव्ह लॉ'नं यासंदर्भात सविस्तर वृत्त दिलं आहे.**



वरीष्ठ वकील अभिषेक मनू सिंघवी यांनी आज शरद पवार गटाकडून युक्तिवाद केला. यावेळी याचिकेतील दाव्यानुसार सिंघवी यांनी अजित पवार गटाकडून शरद पवारांचा फोटो वापरला जात असल्याची तक्रार केली. "अधिकृत मान्यता देण्यात आलेला राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष घड्याळ या चिन्हाचा वापर करत आहे. हे चिन्ह गेल्या कित्येक वर्षांपासून शरद पवारांशीच संबंधित राहिलं आहे. शिवाय, शरद पवारांचं नाव आणि फोटोही अजित पवार गटाकडून प्रचाराच्या फलकांवर वापरले जात आहेत", असं अभिषेक मनू सिंघवी यांनी आपल्या युक्तिवादात नमूद केलं.यावेळी सिंघवी यांनी छगन भुजबळांचं एक कथित वक्तव्यही न्यायालयासमोर वाचून दाखवल्याचं लाईव्ह लॉनं दिलेल्या वृत्ता म्हटलं आहे. या वक्तव्यामध्ये छगन भुजबळांनी मतदारांना आकर्षित करण्यासाठी शरद पवारांचा फोटो व घड्याळ चिन्ह वापरण्यासंदर्भात मत व्यक्त केल्याचं सिंघवी म्हणाले.दरम्यान, सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने अजित पवार गटाला या मुद्द्यावरून सुनावलं. न्यायमूर्ती सूर्य कांत व न्यायमूर्ती के. व्ही. विश्वनाथन यांच्या खंडपीठासमोर यासंदर्भातली सुनावणी झाली. यावेळी न्यायालयाने अजित पवार गटाला शरद पवारांचे फोटो न वापरण्याचे निर्देश दिले. तसेच, घड्याळ चिन्हदेखील न वापरण्याचा सल्ला दिला."तुम्ही त्यांचे फोटो का वापरत आहात? जर तुम्हाला स्वतःवर विश्वास आहे, तर मग तुमचे फोटो वापरा", असं न्यायमूर्ती सूर्य कांत म्हणाले. त्यावर अजित पवार गटाकडून वरीष्ठ वकील मनिंदर सिंग यांनी युक्तिवाद केला. "आमच्या पक्षाकडून त्यांचे फोटो वापरले जात नाहीत. काही त्रयस्थ सदस्यांनी कदाचित वापरला असावा. कार्यकर्त्यांकडून सोशल मीडियावर टाकल्या जाणाऱ्या सर्व पोस्टवर नियंत्रण ठेवणं अशक्य आहे", असं सिंग म्हणाले.दरम्यान, सिंग यांच्या युक्तिवादावर न्यायालयानं पुन्हा एकदा अजित पवार गटाला फटकारलं. "जर तुम्हाला कार्यकर्त्यांच्या सोशल मीडिया पोस्ट नियंत्रित करणं शक्य होत नसेल, तर मग त्यासाठी कोण जबाबदार आहे?

### चिन्हाच्या वापरावरही युक्तिवाद

तुम्ही न्यायालयाला लेखी स्वरुपात हे सांगा की तुम्ही शरद पवारांचे फोटो वापरण्यापासून तुमच्या सर्व सदस्यांना थांबवाल. आता तुम्ही दोन स्वतंत्र गट आहात. त्यामुळे तुम्ही फक्त तुमच्या ओळखीचाच वापर करा. तुम्ही वेगळं होण्याचा निर्णय घेतलाय, मग त्यावर ठाम राहा. तुमच्या पक्षातील कार्यकर्त्यांना आवरणं हे तुमचं काम आहे", असं न्यायालयानं यावेळी नमूद केलं. यावर सिंग यांनी अशी लेखी हमी देण्याचं मान्य केलं.यावेळी अजित पवार गटाकडून घड्याळ चिन्हाचा वापर करण्यावर सिंघवींनी घेतलेल्या आक्षेपावरही न्यायालयाने मत नोंदवलं. "आम्ही तुम्हाला हा सल्ला देत आहोत की तुम्ही घड्याळ चिन्हाचा वापर न करता दुसऱ्या कुठल्यातरी चिन्हाचा वापर करा. निवडणूक आयोगाच्या आदेशाविरोधात न्यायालयासमोर याचिका आलेली आहे. जर आम्ही आयोगाचा निकाल रद्दबातल ठरवला, ऐन निवडणुकीच्या मध्यावर आमचा निकाल आला तर तुम्ही काय कराल?" असा प्रश्न न्यायालयाने केला."त्यामुळे शरद पवार गटाकडे वेगळं चिन्ह आहे, तर अजित पवार गटही वेगळं चिन्ह घेऊन निवडणूक का लढवत नाही? जेणेकरून न्यायालयाच्या निकालाचा कोणताही परिणाम तुमच्यावर होणार नाही आणि तुमचं काम तुम्हाला विनासायास करता येईल.

# पाकिस्तान, बांग्लादेशात २३ टक्के हिंदू

## जनसंघानं नेहमीच फाळणीचा विरोध केला

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**देशभरात सध्या CAA च्या मुद्द्याची जोरदार चर्चा पाहायला मिळत आहे. त्यातही या कायद्यासाठी मोदी सरकारने अधिसूचना काढण्याच्या वेळेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात येत आहे. कायदा २०१९मध्येच पारित झाला असताना अधिसूचना काढण्यासाठी २०२४च्या लोकसभा निवडणुका जाहीर होण्याच्या अवघ्या काही दिवस आधीचा मुहूर्त का निवडण्यात आला? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.**




या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सीएएसंदर्भात उपस्थित करण्यात आलेल्या अनेक मुद्द्यांना एएनआयच्या पॉडकास्टमध्ये उत्तर दिलं आहे. यावेळी त्यांनी पाकिस्तान, बांग्लादेश, अफगाणिस्तानमधील हिंदूंच्या संख्येचा मुद्दा उपस्थित केला."१९४७ मध्ये देशाची फाळणी झाली. देश तीन भागांत विभागला गेला. ती पार्श्वभूमी आहे. भारतीय जनसंघ, भाजपानं नेहमीच विभाजनाला विरोध केला आहे. आम्ही कधीच सहमत नव्हतो. या देशाची फाळणी धर्माच्या आधारावर व्हायलाच नको होती. पण त्यावेळी ती केली गेली. फाळणीनंतर तिथल्या अल्पसंख्यकांवर अनन्वित अत्याचार झाले, धर्मपरिवर्तन केलं गेलं. त्यांच्या महिलांना अपमानित केलं. ते जर भारताच्या आश्रयाला आले, तर त्यांना इथल्या नागरिकत्वाचा अधिकार नाहीये का?" असा प्रश्न अमित शाह यांनी उपस्थित केला."काँग्रेसच्या नेत्यांनीच फाळणीच्या वेळी सांगितलं होतं की आत्ता दंगली चालू आहे. त्यामुळे जिथे असाल तिथेच थांबा. नंतर जेव्हा केव्हा तुम्ही भारतात याल तेव्हा तुमचं स्वागत होईल. पण नंतर निवडणुकांचं, वोटबँकेचं राजकारण चालू झालं. ते आश्वासन काँग्रेसनं कधीच पूर्ण केलं नाही", असं ते म्हणाले."मुस्लीम लोकसंख्येसाठीच देशाची फाळणी करून स्वतंत्र देश देण्यात आला. मग तर प्रत्येक देशातल्या दुरवस्थेमुळे तिथल्या लोकांसाठी भारताचे दरवाजे उघडावे लागतील. जे लोक फाळणीच्या आधी अखंड भारताचा भाग होते आणि ज्यांच्यावर नंतर धार्मिक अत्याचार झाले त्यांना आश्रय देणं आपलं नैतिक कर्तव्य आहे.

# एक राष्ट्र, एक निवडणुक' अहवाल

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

केंद्रातलं मोदी सरकार एक राष्ट्र, एक निवडणूक घेण्याबाबत विचार करत आहे. अशातच या संकल्पनेवर अभ्यास करून त्याची अंमलबजावणी कशी करता येईल याबाबत अहवाल सादर करण्यासाठी माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली होती. या समतीने त्यांचा अहवाल विद्यमान राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू याच्याकडे सुपूर्द केला आहे. कोविंद समितीने त्यांच्या अहवालात अनेक मोठ्या आणि महत्त्वाच्या शिफारसी केल्या आहेत. समितीने एक राष्ट्र, एक निवडणूक घेण्यासाठी संविधान संशोधन करण्याची शिफारस केली आहे. समितीने अशी शिफारस केली आहे की, सरकारने एक कायदेशीर यंत्रणा तयार करावी, ज्याद्वारे देशभरात एकाच वेळी निवडणुका घेणं शक्य होईल. समितीने तब्बल १८,६२६ पानांचा अहवाल सादर केला आहे. केंद्र सरकारने २ सप्टेंबर २०२३ रोजी एका उच्चस्तरीय समितीचं गठण केलं होतं. माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांची या समितीच्या अध्यक्षपदी नेमणूक केली होती. या समितीने तब्बल १९१ दिवस 'एक राष्ट्र एक निवडणूक' या संकल्पनेवर काम केल्यानंतर आज (१४ मार्च) त्यांचा अहवाल सादर केला.माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद आणि या समितीतल्या त्यांच्या सहकाऱ्यांनी आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेऊन त्यांचा अहवाल सादर केला. या समितीने शिफारस केली .

# प्रसिद्ध शोमधून नेहाला देण्यात आलेला डच्चू!



नेहा धुपिया बॉलिवूडमधील लोकप्रिय अभिनेत्री आहे. आत्तापर्यंत तिने अनेक सुपरहिट चित्रपटांमध्ये कामं केली आहेत. सध्या नेहा चित्रपटात झळकत नसली तरी सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात सक्रिय असते. निरनिराळे फोटो व व्हिडीओ पोस्ट करत ती चाहत्यांना अपडेट देत असते. चित्रपटानंतर आता नुकतेच नेहाने ओटीटीवरही पदार्पण केले आहे. नुकताच तिचा ओटीटीवर ‘नो फिल्टर नेहा’चा दुसरा सीझन प्रदर्शित झाला. या कार्यक्रमातून ती बॉलीवूडमधील अनेक कलाकारांच्या मुलाखती घेते. चित्रपटातून ब्रेक घेतल्यावर वाढलेले वजन अन् गरोदर राहिल्याने झालेले बदल यामुळे नेहाला चित्रपटसृष्टीत पुन्हा कमबॅक करताना आलेले अनुभव तिने नुकतेच एका मुलाखतीदरम्यान शेअर केले आहेत. ‘झुम’शी संवाद साधताना नेहा म्हणाली, “मी जेव्हा या चित्रपटसृष्टीत आले तेव्हा महिला कलाकारांना एका ठराविक साच्यातल्याच भूमिका मिळायच्या. जर तुम्ही त्या साच्यात फिट बसत नसाल तर तुम्ही यासाठी योग्य नाही असं सरसकट ठरवलं जायचं. आता चित्र फार वेगळं आहे, कास्टिंगदेखील अगदी चपखल होतं, पण मला बऱ्याचदा कामावरून काढून टाकण्यात आलं आहे. माझा चेहरा आणि वजन कमी करण्यासाठी मी दिलेला नकार यामुळे मलाही बऱ्याचदा नकार पचवावा लागला आहे.”पुढे नेहा म्हणाली, “मी जेव्हा गरोदर होते तेव्हा एका कार्यक्रमातून मला काढून टाकण्यात आलं होतं, अन् त्यानंतर तब्बल ८ महीने त्यांनी तो कार्यक्रम माझ्याशिवाय शूट केला. जेव्हा मला ही गोष्ट समजली तेव्हा मी त्यांना याबद्दल विचारलं तेव्हा ते म्हणाले की त्यांना माझ्याबरोबर काम करायचंच नाहीये त्यामुळेच त्यांनी हा निर्णय घेतला.

# अरबाजने सांगितली त्याची आणि शुराची लव्हस्टोरी



अरबाज खान आणि शुरा खान यांनी २४ डिसेंबर २०२३ रोजी मित्रपरिवारासमवेत लग्नगाठ बांधली. अरबाजच्या चाहत्यांना याचा सुखद धक्का बसला, कारण तोपर्यंत या कपलने त्यांच्या नात्याचा कुठेही खुलासा केला नव्हता. अरबाजने सांगितलं की, लग्नाआधी शुरा आणि तो एक वर्षापासून एकमेकांना डेट करत होते. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत अरबाजने त्याची आणि शुराची पहिली भेट कशी झाली, याबद्दल खुलासा केला आहे. ई-टाइम्सला दिलेल्या मुलाखतीत अरबाज म्हणाला की, त्याने निर्मित केलेल्या ‘पटना शुक्ला’ चित्रपटाच्या सेटवर तो पहिल्यांदा शुराला भेटला. या चित्रपटात रवीना टंडन प्रमुख भूमिकेत होती आणि शुरा रवीनाची मेकअप आर्टिस्ट होती. अरबाजने सांगितलं की, शुरा रवीनाबरोबर सात ते आठ वर्षांपासून काम करत होती. ‘पटना शुक्ला’च्याआधी अरबाज कधीच शुराला भेटला नव्हता किंवा तिच्याबद्दल कधी ऐकलं नव्हतं.अरबाज पुढे म्हणाला की, त्यांची लव्ह स्टोरी सेटवर भेटल्यानंतरसुद्धा खूप वेळानंतर सुरू झाली. सेटवरचा त्यांचा संवाद खूप मर्यादित होता. “रवीनाची केसं नीट कर” किंवा “हॅलो”, “हाय” वगैरे असे संवाद दोघांमध्ये व्हायचे. शूट संपल्यानंतर दोघं काही मीटिंग्समध्ये आणि पार्टीजमध्ये भेटले होते. त्यानंतर त्यांची ओळख वाढली. लोकांना कळण्याआधीच ते एक वर्ष एकमेकांना डेट करत होते. अरबाज असंही म्हणाला की, “आम्ही स्वत:ला खूप नशीबवान समजतो, कारण आम्ही एकमेकांना कॉफी शॉप्समध्ये भेटत होतो. मी तिला घरी सोडायलापण जायचो, तरीही आम्हाला मीडिया, पापाराझी किंवा कोणीही स्पॉट केलं नाही.”दरम्यान, अरबाजच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल सांगायचं झालं, तर १९ वर्षांच्या संसारानंतर २०१७ रोजी अरबाज खान आणि अभिनेत्री मलायका अरोरा यांनी घटस्फोट घेतला.

# डॉन ३ मध्ये दिसणार जान्हवी

फरहान अख्तरच्या डॉन ३ ची घोषणा झाल्यापासून, त्याचे अपडेट्स जाणून घेण्यासाठी चाहते सतत उत्सुक असतात.यावेळी डॉन ३ चर्चेत आहे कारण शाहरुख खान मुख्य भूमिकेत नसेल.निर्मात्यांनी शाहरुख खानच्या जागी रणवीर सिंगला फायनल केले आहे. कियारा अडवाणी रणवीर सिंगसोबत रोमान्स करणार आहे. आता डॉन ३ बाबत कॉरिडॉरमध्ये नवी चर्चा सुरू झाली आहे.कियारा अडवाणी रणवीर सिंगसोबत रोमान्स करणार आहे. आता डॉन ३ बाबत कॉरिडॉरमध्ये नवी चर्चा सुरू झाली आहे. चाहत्यांनी शाहरुख खानला डॉनमध्ये पाहिलं. करीना कपूरनेही तिच्या आयटम नंबरने लोकांचे लक्ष वेधून घेतले. आता या भूमिकेसाठी जान्हवी कपूरला डॉन ३ मध्ये आणले जाऊ शकते.जान्हवी कपूर एक उत्तम अभिनेत्री आहे आणि डान्सच्या बाबतीतही तिची बरोबरी नाही.मात्र, आत्तापर्यंत डॉन ३च्या निर्मात्यांनी आणि स्वतः जान्हवी कपूरने या वृत्ताला दुजोरा दिलेला नाही.तर डॉन ३ बद्दल बोलायचे झाले तर रणवीर सिंग आणि कियारा अडवाणी मुख्य भूमिकेत दिसणार आहेत.फरहान अख्तरच्या डॉन ३ ची घोषणा झाल्यापासून, त्याचे अपडेट्स जाणून घेण्यासाठी चाहते सतत उत्सुक असतात.यावेळी डॉन ३ चर्चेत आहे कारण शाहरुख खान मुख्य भूमिकेत नसेल.



# आलियाला आवडायचा बंगाली पदार्थ

आलिया भट्ट आणि रणबीर कपूर यांनी अनेक वर्षे एकमेकांना डेट केल्यावर १४ एप्रिल २०२२ मध्ये लग्नगाठ बांधली. लग्नानंतर अभिनेत्रीने काही दिवसांतच गरोदर असल्याची बातमी सोशल मीडियावर शेअर केली होती. पुढे, ६ नोव्हेंबर २०२२ रोजी आलियाने राहाला जन्म दिला. सध्या रणबीर-आलियाची लाडकी लेक राहा सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात लोकप्रिय झाली आहे.गेल्यावर्षी ख्रिसमिसच्या निमित्ताने रणबीर-आलियाने राहाला माध्यमांसमोर आणलं. आता राहा दीड वर्षांची झाली आहे. सुद्धा सर्वत्र आलियाच्या लेकीची चर्चा रंगली होती. परंतु, तुम्हाला माहितीये का, लाडक्या लेकीच्या जन्मावेळी अभिनेत्रीला एक खास बंगाली पदार्थ खायची सारखी इच्छा व्हायची. आलियाच्या आहारतज्ज्ञांनी नुकत्याच एका पॉडकास्टमध्ये याबाबत खुलासा केला आहे.

# सुशांत सिंह राजपूतच्या बहिणीने मोदींना केली विनंती

बॉलीवूडचा दिवंगत अभिनेता सुशांत सिंह राजपूत याच्या निधनाला आता चार वर्षे पूर्ण होतील. अजूनही मनोरंजनसृष्टीत त्याची आठवण काढली जाते. प्रेक्षक, चाहते यांच्या मनात सुशांतचं अजूनही तितकंच महत्त्वाचं स्थान आहे. सुशांतच्या आकस्मिक निधनानंतर बॉलीवूड इंडस्ट्रीमध्ये खळबळ माजली होती. सुशांतच्या कुटुंबीयांनाही याचा खूप मोठा धक्का बसला होता. सुशांतने आत्महत्या केल्याचं सांगण्यात आलं होतं; परंतु त्याच्या कुटुंबीयांनी ही आत्महत्या असल्याची गोष्ट नाकारली. नंतर सुशांतची केस सीबीआयकडे सोपवण्यात आली; परंतु अजूनही या केसचा उलगडा झालेला नाही. त्याबद्दल आता सुशांतच्या बहिणीनं थेट भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे मदत मागितली आहे.सुशांतची बहीण श्वेता सिंहनं तिच्या सोशल मीडियावर एक व्हिडीओ शेअर केला आहे. त्यात ती म्हणाली, “मी हा संदेश आपले पंतप्रधान मोदीजी यांच्यासाठी रेकॉर्ड करतेय. तुमचं लक्ष वेधून घेण्याचं कारण असं की, आता माझ्या भावाचं निधन होऊन ४५ महिने झाले आहेत. परंतु, या केसशी संबंधित सीबीआयकडून कोणतीच नवीन माहिती आमच्याकडे आलेली नाही. माझी तुम्हाला विनंती आहे की, कृपा करून या केसमध्ये तुम्ही हस्तक्षेप करा. कारण- एक कुटुंब आणि देश म्हणून आम्हाला पडलेल्या प्रश्नांची उत्तरं आम्ही अजूनही शोधतोय.”सुशांतच्या बहिणीचा हा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. या व्हिडीओवर “सुशांतला न्याय द्या”, अशा अनेक कमेंट्स आल्या आहेत.

# मुंबईने जिंकली रणजी ट्रॉफी!

## रहाणेच्या शिलेदारांनी 8 वर्षांनी पटकावले जेतेपद

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**मुंबईच्या संघाने विक्रमी ४२ व्यांदा रणजी करंडक आपल्या नावे केला आहे. अजिंक्य रहाणेच्या नेतृत्वाखालील संघाने या हंगामात अष्टपैलू कामगिरी करत अंतिम सामन्यात विदर्भाचा १६९ धावांनी पराभव केला. विदर्भच्या संघानेही कडवा प्रतिकार करत मुंबईला सहज विजय मिळवू दिला नाही. अक्षय वाडकर, करूण नायर आणि हर्ष दुबे यांनी मुंबईने दिलेले डोंगराएवढे लक्ष्य गाठण्याचा आठोकाठ प्रयत्न केला खरा पण मुंबईच्या शिलेदारांनीही काही शेवटपर्यंत माघार घेतली नाही आणि रणजी करंडकावर आपले नाव कोरले. धवल कुलकर्णीने त्याच्या अखेरच्या रणजी सामन्यात शेवटच्या षटक टाकत १०वी विकेट घेतली आणि मुंबईचा संघ पुन्हा एकदा चॅम्पियन संघ ठरला.**




पाचव्या आणि शेवटच्या दिवसाचा डाव सुरू झाला तेव्हा विदर्भचा संघ ५ बाद २४८ धावांवर खेळत होता. त्यांना विजयासाठी २९० धावांची तर मुंबईला ५ विकेट्सची गरज होती. अक्षय वाडकर आणि हर्ष दुबेची जोडी मैदानात पाय रोवून उभी होती. वाडकरने रणजी फायनलमधील त्याचे दुसरे शतक पूर्ण केले होते.पण नंतर ९ चौकार आणि १ षटकार लगावत १०२ धावा करणाऱ्या शतकवीराला मुंबईच्या तनुष कोटीयनने शतकी खेळी केलेल्या अक्षय वाडकरला पायचीत करत विदर्भ संघाला मोठा धक्का दिला.तनुषनंतर तुषार देशपांडेने दुबेला झेलबाद करत विदर्भाच्या आशांवर पाणी फेरले.त्यानंतर आदित्य सरवटेची विकेटही देशपांडेच्या नावे होती. तनुष कोटीयनने षटकार लगावणाऱ्या यश ठाकूरला क्लीन बोल्ड केले. नंतर अजिंक्यने शेवटच्या विकेटची जबाबदारी अनुभवी धवलवर सोपवली आणि त्याने आपल्या शानदार गोलंदाजीने उमेश यादवला क्लीन बोल्ड करत सामना मुंबईच्या नावे केला. नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करताना मुंबई पहिल्या डावात २२४ धावा केल्या. प्रत्युत्तरात विदर्भ संघाचा डाव १०५ धावांवर गारद झाला. यानंतर दुसऱ्या डावात मुंबईच्या मुशीर खानच्या शतकाच्या आणि श्रेयस अय्यरच्या ९५ धावा आणि कर्णधार अजिंक्य रहाणेच्या ७३ धावांच्या जोरावर सर्वबाद ४१८ धावांचा डोंगर उभारला आणि विदर्भासमोर ५३८ धावांचे लक्ष्य ठेवले. प्रत्युत्तरात विदर्भकडून सलामीवीर अथर्व तायडे आणि ध्रुव शोरी यांनी त्यांना ६४ धावांची भागीदारी करून दमदार सुरुवात करून देण्याचा प्रयत्न केला पण शम्स मुलाणीने तायडेला बाद करून पहिली विकेट मिळवली. तनुष कोटियनने शोरीला बाद करत लगेचच दुसरी विकेट घेतली. अमन मोखाडे आणि यश राठोडला पायचीत करत त्यांना झटपट माघारी धाडले आणि पाहुण्या संघाने १३३ धावांवर ४ विकेट गमावले होते. करूण नायर चांगल्याच फॉर्मात दिसत होता, विस्फोटक खेळी करत त्याने ७४ धावा केल्या होत्या. पण चौथ्या दिवसाच्या अखेरीस गोलंदाजीला आलेल्या मुशीर खानने नायरला झेलबाद केले. मुंबईने शेवटचं रणजी जेतेपद (२०१५-१६) मध्ये पटकावलं होतं. त्या सामन्यातील ३ खेळाडू या सामन्यातही आहेत. श्रेयस अय्यर, शार्दूल ठाकूर आणि धवल कुलकर्णी. या तिन्ही खेळाडूंनी अंतिम सामन्यात मोठी भूमिका बजावली. ८ वर्षांपूर्वीच्या त्या फायनल सामन्यात श्रेयसने शतक केलं होतं आणि या अंतिम सामन्यातही श्रेयसने ९५ धावांची खेळी केली. शार्दूल ठाकूरने सामन्याच्या पहिल्या डावात संघ बॅकफूटवर असताना ७५ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली आणि संघाची धावसंख्या २०० पार नेली. अनुभवी गोलंदाज धवल कुलकर्णीने अंतिम सामन्यात एकूण ४ विकेट्स घेतल्या. मुंबईने सांघिक प्रदर्शनाच्या बळावर जेतेपद पटकावलं आहे. या हंगामात कर्णधाराची कामगिरी सर्वसाधारण राहिली पण रहाणेने अंतिम सामन्यत ७४ धावांची खेळी केली. मुंबई संघाचा स्टार खेळाडू तनुष कोटीयन याला 'मालिकावीर' म्हणून घोषित केले आहे.

### विदर्भ संघाचा डाव 105 धावांवर गारद

पाचव्या आणि शेवटच्या दिवसाचा डाव सुरू झाला तेव्हा विदर्भचा संघ ५ बाद २४८ धावांवर खेळत होता. त्यांना विजयासाठी २९० धावांची तर मुंबईला ५ विकेट्सची गरज होती. अक्षय वाडकर आणि हर्ष दुबेची जोडी मैदानात पाय रोवून उभी होती. वाडकरने रणजी फायनलमधील त्याचे दुसरे शतक पूर्ण केले होते.पण नंतर ९ चौकार आणि १ षटकार लगावत १०२ धावा करणाऱ्या शतकवीराला मुंबईच्या तनुष कोटीयनने शतकी खेळी केलेल्या अक्षय वाडकरला पायचीत करत विदर्भ संघाला मोठा धक्का दिला.तनुषनंतर तुषार देशपांडेने दुबेला झेलबाद करत विदर्भाच्या आशांवर पाणी फेरले. त्यानंतर आदित्य सरवटेची विकेटही देशपांडेच्या नावे होती. तनुष कोटीयनने षटकार लगावणाऱ्या यश ठाकूरला क्लीन बोल्ड केले. नंतर अजिंक्यने शेवटच्या विकेटची जबाबदारी अनुभवी धवलवर सोपवली आणि त्याने आपल्या शानदार गोलंदाजीने उमेश यादवला क्लीन बोल्ड करत सामना मुंबईच्या नावे केला.नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करताना मुंबई पहिल्या डावात २२४ धावा केल्या. प्रत्युत्तरात विदर्भ संघाचा डाव १०५ धावांवर गारद झाला.

# 'आयपीएल सुरू होण्याआधीच 'या' खेळाडूंनी घेतली माघार

## रणजी करंडक: मुंबईच्या संघाला विजसासाठी 5 विकेट्सची गरज

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारत आणि इंग्लंडदरम्यानची पाच कसोटी सामन्यांची मालिका संपलीय आणि आता क्रिकेट चाहत्यांना उत्सुकता लागली आहे ती इंडियन प्रीमिअर लीग अर्थात आयपीएलची. आयपीएल २०२४ ( २०२४) स्पर्धेला येत्या २२ मार्चपासून सुरु होतेय. पण त्याआधीच अनेक संघांना मोठा धक्का बसला आहे. तब्बल नऊ खेळाडू या स्पर्धेतून बाहेर पडले आहेत.**




यात टीम इंडियाचा स्टार गोलंदाज मोहम्मद शमी ( ), मार्क वूड, जेसन रॉय आणि हॅरी ब्रूक या स्टार खेळाडूंचाही समावेश आहे. काही खेळाडू संपूर्ण आयपीएल हंगामाला मुकणार आहेत. तर काही खेळाडू काही सामने खेळू शकणार नाहीत. यातले काही खेळाडू दुखापतीमुळे खेळू शकणार नाहीत. तर काही खेळाडूंनी व्यस्त वेळापत्रकामुळे स्पर्धेतून नाव मागे घेतलं आहे. काही खेळाडूंनी वैयक्तिक कारणाने आयपीएल खेळण्यास नकार दिला आहे. आयपीएलच्या सतराव्या हंगामात सर्वात मोठा धक्का बसला आहे तो गत उपविजेत्या गुजरात टायटन्सला ( ). संघाचा स्टार खेळाडू मोहम्मद शमी पायाच्या दुखापतीमुळे आयपीएलच्या संपूर्ण हंगामातून बाहेर पडलाय. एकदिवसीय विश्वचषकानंतर मोहम्मद शमी एकही आंतरराष्ट्रीय साना खेळलेला नाही. टी विश्वचषकातही तो खेळणार नसल्याचं स्पष्ट झालं आहे. याशिवाय ऑस्ट्रेलियाचा विकेटकिपर फलंदाज मॅथ्यू वेडनेही गुजरातला झटका दिला आहे. पहिल्या एक किंवा दोन सामन्यात वेड खेळू शकणार नाही. मॅथ्यू वेड स्थानिक स्पर्धा शेफील्ड शील्ड टूर्नामेंट खेळणार आहे. त्यानंतर तो गुजरात टायटन्समध्ये सहभागी होणार आहे.केएल राहुल नेतृत्व करत असलेल्या लखनऊ सुपर जायटंसलाही याचा फटका बसलाय.

### चेन्नई सुपर किंग्सला मोठा धक्का

न्यूझीलंडचा स्टार सलामीवीर डेवॉन कॉन्वेने एमएस धोनीच्या चेन्नई सुपर किंग्सला मोठा धक्का दिला आहे. अंगठ्याच्या दुखापतीमुळे कॉन्वे आयपीएलमधून बाहेर पडला आहे. त्याच्या जागी कोणत्या खेळाडूला संधी मिळणार हे अद्याप सीएसकेने स्पष्ट केलं आहे. ऋषभ पंतच्या दिल्ली कॅपिटल्समधून इंग्लंडचा स्टार फलंदाज हॅरी ब्रुक खेळणार नाहीए. दिल्ली कॅपिटल्सने ब्रूकवर ४ कोटी रुपयांची बोली लावली होती. टी क्रिकेटचा नंबर वन फलंदाज सूर्यकुमार यादवनेही मुंबई इंडियन्संच टेन्शन वाढवलं आहे. आयपीएलच्या पहिल्या दोन सामन्यात सूर्यकुमार खेळू शकणार नसल्याचं सांगितलं जात आहे. न्यूझीलंडचा स्टार सलामीवीर डेवॉन कॉन्वेने एमएस धोनीच्या चेन्नई सुपर किंग्सला मोठा धक्का दिला आहे.